| MHPU160020422023 | कि.अर्ज क्र.३९५/२०२३<br>श्री.पांडुरंग कोंडीबा कोंढाळकर<br>विरुध्द<br>कोणीही नाही. |
|---|---|

## निशाणी १ खालील आदेश
## (दि.२९.०९.२०२३)

अर्जदाराने जन्म मृत्यू नोंदणी कायदा सन १९६९ चे कलम १३(३) प्रमाणे जन्म नोंद प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**अर्जदाराची केस थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. अर्जदार हे मौजे मगरवाडी, बारामती, ता.बारामती, जि.पुणे येथील कायमचे रहिवासी असून अर्जदार हे पूर्वी सोमेश्वरनगर, वाघळवाडी येथे राहत होते. अर्जदार यांची मुलगी नामे प्रियंका पांडुरंग कोंढाळकर हिचा जन्म दि.२१.०१.१९९४ रोजी मौजे सोमेश्वरनगर, वाघळवाडी येथे राहते घरी झाला. अर्जदार व त्यांचे कुटुंबीयांकडून नजरचुकीने अर्जदार यांचे मुलीचे जन्माची नोंद ग्रामपंचायत वाघळवाडी यांच्याकडील जन्म–मृत्यू रजिस्टरला करावयाची राहून गेली.

३. अर्जदार यांनी त्यांचे मुलीच्या जन्म नोंदीचा दाखला मिळण्यासाठी ग्रामपंचायत वाघळवाडी, ता.बारामती, जि.पुणे यांच्याकडे संपर्क साधला असता संबंधित विभागाने सन १९९४ चे जन्मनोंद रजिस्टरला अर्जादार यांचे मुलीच्या जन्माची नोंद आढळून येत नसल्याबाबत दि.१९.०७.२०२३ रोजी अनुपलब्धता प्रमाणपत्र दिले. अर्जदार यांना त्यांचे मुलीचा जन्मनोंद दाखला मुलीचे पुढील शिक्षणासाठी व कायदेशीर कामाकरीता आवश्यक आहे. त्यामुळे, अर्जदार यांनी त्यांच्या मुलीचे जन्माची नोंद ग्रामपंचायत वाघळवाडी, ता.बारामती, जि.पुणे यांचे रेकॉर्डला करुन तसा दाखला मिळावा म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. अर्ज दाखल झालेनंतर सदर अर्जाची नोटीस दि.१९.०८.२०२३ रोजीचे दै. 'नवराष्ट्र' या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली व सदर अर्जास हरकत मागण्यात आली. परंतु, सदर दैनिक वृत्तपत्रामधील नोटीसच्या अनुषंगाने अर्जदाराचे मुलीच्या जन्म दिनांकाबाबत

कोणीही हरकत उपस्थित केली नाही.

५. अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ठ्यर्थ स्वतःचे प्रतिज्ञापत्र व सरतपासाचे शपथपत्र दिले आहे. तसेच, साक्षीदार क्र.१ सौ.अनिता पांडुरंग कोंढाळकर, वयः५३ वर्ष, धंदा – गृहिणी, रा.मगरवाडी, ता.बारामती, जि.पुणे यांचे शपथपत्र दिले आहे. अर्जदार यांनी दि.१९.०८.२०२३ रोजीचे दै. 'नवराष्ट्र' हे वृत्तपत्र दाखल केले आहे. तसेच, अर्जदार यांनी दि.१९.०७.२०२३ रोजीचे ग्रामपंचायत वाघळवाडी, ता.बारामती, जि.पुणे यांचेकडील अनुपलब्धता प्रमाणपत्राची मुळप्रत, स्वतःचे आधारकार्ड छायांकित प्रत तसेच, अर्जदार यांचे मुलीचे आधारकार्ड व १० वीचे प्रमाणपत्र सत्यापित प्रत इ. कागदपत्र दाखल केले आहेत.

६. अभिलेखावरील सदर सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट होते की, अर्जदार यांची मुलगी नामे प्रियंका हिचा जन्म दि.२१.०१.१९९४ रोजी झाला. परंतु, तीच्या जन्म दिनांकाची नोंद जन्म मृत्यू नोंदणी विभाग, ग्रामपंचायत वाघळवाडी, ता.बारामती, जि.पुणे यांचे अभिलेखात करण्याचे अर्जदार व त्यांच्या कुटूंबीयांकडून नजरचुकीने करावयाची राहून गेली. सदर नोंद एक वर्षापेक्षा अधिक काळात न झाल्याने सदरची नोंद जन्म मृत्यु कायदा कलम १३(३) अन्वये होणे गरजेचे आहे. त्यामुळे, जन्म–मृत्यु नोंदणी कायदा कलम १३(३) अन्वये सदर अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| **१.** | अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| **२.** | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वाघळवाडी, ता.बारामती, जि.पुणे यांनी अर्जदार यांची मुलगी नामे **प्रियंका पांडुरंग कोंढाळकर** हिचे '**दि.२१.०१.१९९४**' रोजीचे जन्माची नोंद योग्य ती फी आकारुन जन्म–मृत्यू अभिलेखामध्ये करावी. |

| | |
|---|---|
| | GIRHE ANNASAHEB JAGANNATH<br>Digitally signed by GIRHE ANNASAHEB JAGANNATH<br>Date: 2023.09.30 18:46:09 +0530<br>( अ. ज. गिऱ्हे ) |
| ठिकाणः बारामती | न्यायदंडाधिकारी, वर्ग–१, |
| दिनांकः २९.०९.२०२३ | (न्यायालय क्र.२), बारामती. |

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | महेश शरद भावसार, श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | श्री. अ. ज. गिऱ्हे,<br>२ रे सह दिवाणी न्यायाधिश तथा न्यायदंडाधिकारी वर्ग–१, बारामती |
| न्यायनिर्णयाची तारिख | २९/०९/२०२३ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | २९/०९/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | ३०/०९/२०२३ |